**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०३,/२०१५-१६/१७४ दिनांक: १९/१२/२०१५

**आदेश केस क्र.०३,/२०१५-२०१६**

१) सौ. अश्विनी प्रसाद भिडे : अर्जदार.
११६०/ब ई वॉर्ड साईक्स एक्स्टेशन, कोल्हापूर
जिल्हा. कोल्हापूर

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, शहर विभाग, कोल्हापूर

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १५-१०-२०१५ रोजी घेण्यात आली. सुनावणीसाठी अर्जदार श्री. सुहास सुधाकर पोवार व सौ. आश्वीनी प्रसाद भिडे, यांचे प्रतिनिधी श्री. प्रसाद भिडे, हे हजर होते. वि.प. तर्फे श्री. एस. एस. आरळी व श्री. राजेंद्र हजारे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पुर्व उपविभाग कोल्हापूर हे हजर होते.

(१) तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी .

श्री. सुहास सुधाकर पोवार व सौ. अश्वीनी प्रकाश भिडे, रा. कोल्हापूर या दोन्ही तक्रारीमधील तक्रार मजकुर तसेच त्या संबंधी महावितरणची भुमीका यांचा अभ्यास करुन दोन्ही तक्रारी संदर्भात एकच आदेश पारीत करण्यात येत आहे.

सदर दोन्ही तक्रार दारांनी आपली अ नमुन्यातील तक्रार दिनांक ०५-०५-२०१५ रोजी दाखल केली आहे. सदर तक्रार दाराने २०-०८-२०१४ रोजी मंचाकडे अंतरिम आदेशासाठी अर्ज केला होता. त्यावेळी मंचाने तक्रार दारांचा अर्ज मंजुर केला आहे.

विपने दोन्ही तक्रारदारांना दिनांक ०८-०८-२०१४ रोजीचे पत्र क्र. ४०२ महावितरण शाखा शाहुपूरी यांचेकडून दिले गेल्यामुळे सदर तक्रार अर्जास कारण घडले आहे. दाखल केलेली कागदपत्रे पत्र व्यवहार तसेच विपने दाखल केलेली कागदपत्रे सुनावणी दरम्यान दोन्ही बाजुंची कथने आणि म्हणने याचा विचार करता तक्रारदाराच्या मागणीचे स्वरुप खालील प्रमाणे दिसून येते.

**स्वरुप.**

दोन्ही तक्रार दार कोल्हापूर येथील रहिवाशी असून त्यांची सर्व्हे नं. ११६०/१ बी, पवार पॅलेस नामदेव नेस्ट, कमला कॉलेज समोर कोल्हापूर येथील बहुमजली इमारतीमध्ये श्री. सुहास सुधाकर पोवार हे तळमजल्यावर व अश्वीनी प्रसाद भिडे यांची सदनिका बेसमेंटमध्ये आहे. येथे विपने ग्राहकाच्या मागणीनुसार नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रे घेवून वीज जोडणी दिली आहे. ज्या कारणासाठी वीज जोडणी घेतली आहे त्याच कारणासाठी मंजुर भारापेक्षा कमीच वापर चालू आहे. असे असताना दिनांक ०८-०८-२०१४ रोजी विपच्या शाहुपूरी शाखेने पत्र क्र. ४०२ ने पत्र पाठवून एकाच कारणासाठी दोन कनेक्शनचा वापर असलेबाबत कळवून वीज अधिनियम २००३ मधील कलम १२६ चा भंग आपणाकडून झालेला आहे. सबब, दोन्ही मिटरचा एकत्रित वापर गृहित धरुन त्याप्रमाणे वीज दराची आकारणी मागील कालावधीपासून करणेत येईल व ते बील भरणे आपणावर बंधनकारक राहिल अशा आशयाचे पत्र दिले. तसेच दोन्ही पैकी एक कनेक्शन बंद करणेचा अर्ज देणेत यावा. बाकी कायदेशीर पुर्तता ७ दिवसात करावी अन्यथा कंपनीतर्फे एक मिटर काढणेची कारवाई करणेत येइल व फरकाचे बील भरणे बंधनकारक राहिल इत्यादी मजकुराचे पत्र विपने दिल्यामुळे संबंधीतांना भेटून अर्जदारांनी कागदपत्रासह आपले म्हणणे सांगीतले. तरी सुध्दा आपल्या भुमीकेस विप चिकटून राहिल्याने आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत अर्जदाराने प्रथमत: अंतर्गत कक्ष कोल्हापूर यांचे समोर क्ष नमुन्यात तक्रार दाखल करुन लगेचच अंतरीम आदेशासाठी मंचात अर्ज केला. त्यानंतर अ नमुन्यात अर्ज दाखल केला. ग्राहकाने सदरची दिनांक ०८-०८-२०१४ विपची नोटीस व मजकूर मान्य नसल्याने ती मागे घ्यावी. विनाकारण नोटीस तारखेपासून आज अखेर होणारा आर्थीक खर्च व मानसीक त्रास याची टोकन स्वरुपात भरपाई मिळावी व संबंधीतांना योग्य ती समज द्यावी अशी मागणी मंचात केली आहे.

## वि.प.ची सर्व साधारण भुमीका स्वरुप व कार्यवाही

वि.प.ने आपल्या दिनांक ०८-०८-२०१४ च्या पत्रात तपासणीमध्ये एकाच कारणासाठी दोन कनेक्शनचा वापर होत असल्याचे आढळल्यामुळे अधिनियम २००३ चे कलम १२६ चा उल्लेख करुन नोटीस दिल्याचे नमुद केले आहे. वि.प.ने आपले होत असलेले आर्थीक नुकसान टाळणेसाठी वरील पत्र दिले असल्याचे सांगीतले. त्यासाठी वीज आयोगाच्या टेरीफ ऑर्डरच्या अनुषंगाने कंपनीने प्रसिध्द केलेले परिपत्रक क्र. १७५ दिनांक ०५-०९-२०१४ हजर केले आहे. तसेच सी.जी.आर.एफ. कल्याण यांचा दिनांक २१-११-२०१२ चा आदेश व सप्लाय कोड, २००५ ची प्रत जोडली आहे. तसेच विधी सल्लागार यांचेही मत व अभिप्राय याची प्रत जोडली आहे. यावरुन वि.प. आपल्या भुमीकेशी ठाम असल्याचे तसेच महावितरणचे होणारे आर्थीक नुकसान टाळणेसाठी वरील कारवाई केल्याचे संबंधीतांना सांगीतले. सुनावणीच्यावेळी तक्रारदार, प्रतिनिधी व वि.प.चे संबंधीत अधिकारी उपस्थित होते. सर्व कागदपत्रांची छाननी, पडताळणी तसेच सुनावणी दरम्यान दोन्ही बाजुंनी मांडलेली कथने याचा एकत्रित विचार करता न्याय निर्णयासाठी पुढील मुद्दे उपस्थित होतात.

१) वरील नोटीस व मजकुर ग्राहकाच्या मागणी प्रमाणे रद्द करता येईल का.?.

उत्तर : होय.

२) ग्राहकाच्या इतर मागण्याबाबत मंच सहमत आहे काय ?.

उत्तर : अंशतः

३) आदेश.

उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारण मिमांसा.

ग्राहकाने ०८-०८-२०१४ च्या वि.प.च्या पत्रास आक्षेप घेवून सदर तक्रार दाखल केल्याचे दिसून येते. अधिनियम ३ मधील १२६ कलम प्रत्यक्षात कार्यवाही व कारवाई करण्याचे कलम आहे. नोटीस देण्याचे नाही. एकाच मालकी हक्कात एकाच कारणासाठी दोन जोडण्या असतीलतर एकत्रित करण्यासाठी या कलमाचा वापर करणेचा नसुन मंजुर कारण स्थळ, भार इत्यादी बाबींचा भंग केल्यास म्हणजेच घरगुती जोडणीचा वापर व्यापारी कारणासाठी करणे. मंजुरीपेक्षा जास्त भार वापरणे तसेच मंजुर स्थळाच्या बाहेर वापर करणे. इत्यादी बाबी महत्वाच्या आहेत. वर नमुद केल्यापैकी असे कोणतेही गैरकृत्य तक्रारदार ग्राहकाकडून झालेले दिसून येत नाही.

ग्राहकाने मंजुरीप्रमाणे वापर करणे कायद्यास अभिप्रेत आहे. पण तसे न वागता मंजुरीपेक्षा जादा लोड अनधिकृतपणे वाढवून कंपनीचे आर्थीक नुकसान होणार असेल तर सदर १२६ कलमाचा वापर करणे उचित आहे. असे कोणतेही कृत्य तक्रारदार ग्राहकाकडून झालेले दिसुन येत नाही. श्री. पवार व सौ. भिडे यांनी वि.प.कडून रितसर जोडणी मंजुर करुन घेतली आहे. व ज्या कारणासाठी व जेव्हढी जोडणी मंजुर आहे. आणि मंजुरीचे ठिकाण यात कोणताही बदल नाही. तसा कोणताही आक्षेप वि.प.ने नोंदविलेला नाही. तथापी, दोन्ही तक्रारदार ग्राहकांच्याकडे एकच ग्राहक म्हणजे ॲक्सीस बॅक आहे. हे गैर लागू कारण पुढे करुन वि.प.ने सदर नोटीस दिलेली दिसते. वि.प.ने या संदर्भात विधी सल्लागार यांचे मत मागविल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे

१) ज्युनियर लॉ ऑफिसरसाो, कोल्हापूर पत्र क्र. ६५७९ दिनांक २५-०८-२०१४.
२) लिगल ॲडव्हायझर पुणे रिझन पुणे झोन पत्र क्र. ४५० दिनांक ०१-०९-२०१४.
३) चिफ लिगल ॲडव्हायझर मुंबई, पत्र क्र. ३०७१२ दिनांक ०८-१०-२०१४.
४) अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पुर्व उपविभाग कोल्हापूर, पत्र क्र. ३७७४ दिनांक ०१-११-२०१४.
५) ज्युनियर लॉ ऑफिसरसाो कोल्हापूर पत्र क्र. ८०३० दिनांक २१-१०-२०१४.
६) चिफ लिगल ॲडव्हायझर मुंबई, पत्र क्र. ३३२५६ दिनांक १५-११-२०१४.

या पैकी कोणत्याही पत्रात तपशील अधिनियम ३ किंवा विनिमय ५ मधील तरतुदींचा उल्लेख करुन सदर कलमांचा भंग होत असल्याचे नमुद केलेले नाही. या उलट वस्तुस्थितीचा फिजीकल रिपोर्ट पाठविल्यास विचार करता येऊ शकतो तसा अहवाल पाठविण्याचे नमुद केले आहे. तथापी, कोणतेही बेकायदेशीर कृत्य ग्राहक तक्रारदाराने केलेले नाही. बहुमजली इमारतींना जोडणी देताना आयोगाने विनिमयात तरतुद केलेली कागदपत्रे घेवूनच जोडणी दिल्याचे दिसून येते. तसेच दिनांक ०९-११-२०१० रोजी शहर विभाग कोल्हापूर यांनी ग्राहक वीज वापर तपासणी अहवालची प्रत जोडली आहे. सदर अहवालावर श्री. सुहास पोवार व सौ. अश्विनी भिडे यांचे नांव आहे व वापर मंजुरीप्रमाणे योग्य पध्दतीने चालू आहे व ॲक्सीस बँकेसाठी वापर असल्याचे नमुद केले आहे, असे असताना कलम १२६ चा उल्लेख करुन सदरची नोटीस का दिली असावी हे बारकाईने तपासताना असे दिसून आले की, सदर इमारतीमध्ये श्री. सुधाकर नामदेव पवार या नांवाचे वि.प.चे ग्राहक आहेत त्यांनी आपणास भार वाढवून मिळणेसाठी कागदपत्रासह रितसर अर्ज केला त्यावेळी अर्ज मागणीनुसार तपासणी करताना कोणतीही गैरबाब नजरेस आली नाही. अर्ज नाकारणेचे कारण नाही. तथापी, चुकीचे कारण पुढे करुन वरील तक्रारदार ग्राहक श्री. सुहास पवार व सौ. आश्वीनी भिडे यांना नोटीस दिली. त्यांची कोणतीही मागणी नाही, वापर चुकीचा नाही, बील भरणा वेळच्यावेळी व योग्य प्रकारे केला जातो मग आशी नोटीस का आली यामुळे ग्राहक गोंधळला व घाबरुन गेला आणि यामुळे त्याने अन्यायी पत्राबद्दल मंचापुढे सदरचे पत्र रद्द करावी अशी दाद मागीतलेची दिसून येते. ग्राहकाने वि. प. च्या पत्रात नोंदविल्याप्रमाणे १२६ या कलमातील कोणत्याही तरतुदीचा भंग केलेला दिसून येत नाही. म्हणूनच मुद्दाक्रमांक १ चे उत्तर होय म्हणून नोंदवले आहे. सबब, वि.प.चे पत्र क्र. ४०१ सौ. अश्विनी प्रसाद भिडे आणि ४०२ श्री. सुहास सुधाकर पोवार दि.०८-०८-१४ ची नोटीस, पत्र पुर्णपणे रद्द करावे असे मंचाचे मत आहे.

वि.प.ने सदर इमारतीमधील आणखी एक ग्राहक श्री. प्रसाद भिडे यांच्या जोडणीमधून श्री. सुधाकर पोवार यांना कनेक्शन जोडून दिले आहे. तसेच दिनांक ३१-१२-२०१४ रोजी पत्र क्र. ४३९१ ने मॅनेजर ॲक्सीस बॅंक कोल्हापूर यांना पत्र लिहून आपण कनेक्शनसाठी अर्ज करावा असे पत्र लिहिले आहे, या दोन्हीही बाबी गैरलागू असून वि. प. ने याची रितसर नोंद घेऊन सुधारणा करावी.

विजेचा योग्य वापर करणारे ग्राहक कोण आहेत याचा वि.प.ने शोध घेणे आवश्यक आहे. कंपनीचा महसूल योग्य मार्गाने व योग्य पध्दतीने वाढवलाच पाहिजे याच्याशी मंच सहमत आहे. सबब, अशा ग्राहकांना त्रास होणार नाही याची व्यवस्थापनाने काळजी घ्यावी आणि संबंधीतांना तशा सुचना द्याव्यात असा आदेश मंच देत आहे. ग्राहकाची टोकन स्वरुपात भरपाईची मागणी मान्य न करता त्यांना सन्मानपुर्वक वागणूक देण्याची ग्वाही द्यावी अशी अपेक्षा वि. प. कडुन हा मंच करीत आहे. सबब, मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः असे नमुद केले आहे.

**आदेश.**

१) पत्र क्र. ४०२ दिनांक ०८-०८-२०१४ वि. प. ची नोटीस व मागणी रद् करणेत यावी.

२) ग्राहकाला सन्मानपुर्वक सेवेची ग्वाही द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : १९-१२-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.